# गट्टयाचा इंजिनिअर

मी अमोल पाटील. मूळचा अकोल्याचा. मी पुण्याच्या Modern Engineering कॉलेज मधून इलेक्ट्रिकल इंजिनीरिंग मध्ये BE केलं. २००८ मध्ये निर्माणच्या दुसऱ्या बॅचच्या शिबिरात सहभागी झालो. त्यानंतरही पुन्हा शिबीर अटेंड केले.

इंजिनीरिंग पूर्ण झाल्यावर मला महावितरण मध्ये जॉब मिळाला आणि जळगावच्या शहरी भागात पहिली पोस्टिंग मिळाली. पण निर्माण शिबिरांनंतर मनात एक विचार जोम धरू लागलाच होता, जिथे माझी गरज आहे आणि जिथे माझ्या शिक्षणाचा सर्वाधिक उपयोग होऊ शकेल, अशाच ठिकाणी जॉब करावा. जळगावच्या अर्बन पोस्टिंग मध्ये खास, माझी अशी गरज नव्हती किंवा मी इंजिनीरिंगच्या चार वर्षात मिळवलेल्या शिक्षणाचा काही नवीन उपयोग होणार नव्हता. त्यामुळे तिथून बाहेर पडून गडचिरोलीमध्ये पोस्टिंग मिळावी म्हणून मी प्रयत्न सुरु केले. खरंतर सरकारी नोकरीमध्ये शिक्षा म्हणून गडचिरोलीचा बदली वगैरे केली जाते आणि मग तिथून बाहेर पाडण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. अशा परिस्थितीची जाणीव असतानाही मी स्वतःहून तिथे जातोय हे कळल्यावर घरच्यांपासून, मित्रांपर्यंत सर्वांचा विरोध, मस्करी सुरु झाली. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यातून बाहेर पडताना कित्येक वर्ष वाट बघावी लागते पण बदली होऊन तिथे दाखल व्हायला मला फक्त पंधरा दिवस लागले. गडचिरोली जिल्ह्याच्या धानोरा तालुक्यातील गट्टा ह्या गावी बदली झाली. पुढच्या पाच साडेपाच वर्षांत आम्ही गट्टा आणि आसपासच्या २० गावात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच वीज पोहचवू शकलो.

मुळात माझ्या कामाचे स्वरूप माझ्यासाठी आधीच्या पोस्टिंग पेक्षा नवीन होते. गडचिरोलीतल्या माझ्या कार्यक्षेत्रात येणारी गावं अतिदुर्गम होती. दाट जंगलातून जाणारा रस्ता आणि त्यांच्या मधेच वसलेली हे आदिवासी पाडे. हा सगळा भाग तसा नक्षलग्रस्त, अतिसंवेदनशील. गट्टयाला जॉईन होण्या आधी ऐकून होतो पण आता प्रत्यक्ष अनुभवत होतो. जॉइनिंग च्या आधी लोकांचे सल्ले ऐकून demotivate व्हायचो, थोडं टेन्शन यायचं, भीती वाटायची. पण गट्टयात प्रत्यक्ष कामाला



सुरुवात झाल्यावर मग मात्र टेन्शनची जागा excitement आणि मजेने घेतली. त्या वेळी गावांत फोनसाठी टॉवरच नव्हते. त्यामुळे फोनवर संपर्क शक्य नव्हता. जवळचा पेट्रोल पंप ५० किलोमीटरवर त्यामुळे जंगलात मधेच गाडी बंद पडली तर काय, हीच भीती असायची. म्हणजे गडचिरोली मुंबई पुण्यापासून १००० किलोमीटर दूर आणि १००० वर्षं मागे ते कसं हे तिथे राहूनच पुरेपूर अनुभवलं. सहसा इंजिनीरिंग झाल्यावर एखाद्या प्रायव्हेट कंपनीतला, चकाचक एअर कंडिशन्ड ऑफिस मधला जॉब किंवा सरकारी नोकरीतला सुस्त निवांत कारभार, अशा वास्तवापेक्षा माझा जॉब खूपच वेगळा होता आणि मी स्वतः निर्णय घेऊन मिळवलेला होता.

गट्टयातलं माझं ऑफिस, पत्र्याचं पडीक होत. त्याची डागडुजी करावी लागली. पण माझ्या कामातून मिळणारं समाधान शब्दांत व्यक्त करण्यासारखं नव्हतं. मला मुंबई पुण्यातल्या लाईफ-स्टाईल मध्ये ते मिळणं शक्य नव्हतंच. ज्या वयात माझे काही मित्र परदेशात जायची काठावरून शेळया हाकलून ते मिळत नाही. त्यामुळे खरंतर मागचा पुढचा जास्त विचार न करता मी निर्णय घेतला. "करके देखों"... म्हटलं करूनच पाहू!

राहिला प्रश्न फायद्या तोट्याचा...



संधी कशी मिळेल किंवा सॅलरीतले शून्य कसे वाढतील, किंवा MBA करू की MS, वीकेण्डचे काय प्लॅन्स बनवायचे अशा फेज मधून जात होते तेव्हा मी लोकांच्या मते गट्टयातल्या socially isolated भागात राहत होतो. पण मला मी काही वेगळं करतोय, असं वाटलंच नाही. उलट इथल्या एन्जॉयमेंटला तोड नाही!

माणूस सहसा, माझ्या इनपुट मधून मला काय आउटपुट मिळतंय आणि अधिकाधिक आउटपुट कसं मिळेल याचा विचार करतोच आणि त्यात गैर काहीच नाही. काही लोकांसाठी ते पैशाच्या मोबदल्याच्या स्वरूपात असतं तर काही माझ्यासाठी ते कामातून मिळणाऱ्या समाधानाच्या रूपात होतं. समाधान वगैरे संकल्पना खूप सापेक्ष आणि अमूर्त स्वरूपात असतात. त्याची मोजदाद करता येत नाही, ते अनुभवावंच लागतं.

गडचिरोलीतल्या साडेपाच वर्षांत एकदाही तोटा झाल्याचं मला आठवत नाही. आम्ही electrify केलेली पहिली तीन गावं- हेरेंडा, भेंडीकन्हार आणि एडंपायली. गावात पहिल्यांदा वीज आल्यानंतर तर त्यांना झालेल्या आनंदाचं गणित कुठे फायदा तोट्यात बसवायचं! हळूहळू एक एक करत २० गावांत वीज आली. गावकऱ्यांना खूप कौतुक वाटलं. पुढे मग रूढार्थाने फायदा वगैरे म्हणून गणल्या जाणाऱ्या गोष्टी घडल्या. वर्तमानपत्रात नाव आलं, शासनाकडून प्रशस्तिपत्रक मिळालं. तसं ‘Appreciation Certificate’मिळवणारा मी पहिलाच employee होतो. "माझ्या 'करिअरच' काय होणार?" हा विचार तर कधीच आला नाही. उलट आपल्या कामाचे समोरच काहीतरी मोठे मूर्त स्वरूपातले results दिसत आहेत, हे बघून पुढच्या कामाचा उत्साह वाढत गेला.

प्रोफेशनल करिअर पलीकडचे फायदे तर दर दिवशी दिसायचे आणि मला एक व्यक्ती म्हणून समृद्ध करून जायचे. आदिवासी लोकांकडून पुष्कळ शिकायला मिळाले. आदिवासी आणि आपल्या जीवनाचे पॅरामीटर्स परस्पर भिन्न. आपण कुठल्याशा प्रकारची, न दिसणारी अशा life security मागे धावत असतो. आदिवासी लोकांकडे आपल्यासारखे insurance नाही, म्हातारपणाची जमवलेली पुंजी नाही कि डझनभर policies नाहीत. आजचा दिवस तेवढा जगायचा, गरजा कमीत कमी ठेवायच्या.. आदिवासींची हि समाधानी वृत्ती माझ्यात थोड्याफार प्रमाणात तरी रुजली.

त्यांच्या दृष्टीने मी खूप शिकलेला, साहेबच.. पण जंगलात फिरताना, line टाकताना, fault शोधताना मी त्यांच्या समोर अशिक्षित असायचो आणि ते मात्र जंगलाचे राजे! माझं काम लोकांच्या सहभागाशिवाय शक्यच नव्हतं. त्यांना माझी नाही, तर मला त्यांची गरज होती. आदिवासींनी मला down-to-earth राहायला शिकवले.

आजकाल आरोग्यापासून राजकारणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात लोकसहभाग, community engagement, community mobilization, people's participation वगैरे संकल्पनांवर भर दिला जातो. पुस्तकांपलीकडे वाचून ते प्रत्यक्षात उतरवणे तसे सोपे नसते. माझ्या गावांमध्ये कधी वीजच नसल्यामुळे तिथे lineman, workers वगैरे असण्याची शक्यताच नव्हती. अशा वेळी मला गावातल्या युवकांना हाताशी धरून त्यांना training देऊन electrificationची कामं करावी लागली. कुठल्या तरी कामात गुंतून राहिल्यामुळे त्यांना रोजगार मिळाला आणि तेवढेच त्यांचे दारूचे सेवन तेवढ्यापुरते थांबले. लोकसहभागाचे प्रत्यक्ष धडे मी गट्ट्यातल्या वास्तव्यात चांगलेच गिरवू शकलो.

आदिवासी हा मागास, गरीब, व्यसनी अशी त्याची ओळख असते. पण असा गरीब, दारिद्र्य रेषेखाली राहणारा आदिवासी हा तितकाच स्वाभिमानी असतो हे सांगितले तर खरे वाटणार नाही. महाराष्ट्राच्या इतर भागांत वीजचोरी सर्रास चालू असताना एखाद्या अशिक्षित आदिवासी कुटुंबाला मात्र आपल्यामुळे कोणाचेतरी (सरकारचे) नुकसान होत आहे हि जाणीव प्रकर्षाने होत असते. वेळप्रसंगी हीच गरीब, मागास जनता ४० रुपयाची विजेची थकबाकी घरातलं तांदळाचं पोतं विकून देखील करतात! ते अंधारात राहणं पसंत करतात पण विजेची चोरी कधीच करत नाहीत.

२०११ सालच्या क्रिकेट वर्ल्ड कप मधील भारत-पाकिस्तान फायनल मॅचच्या एक दिवस आधी मुंगनेर गावात आम्ही पहिल्यांदा वीज आणली. माझ्यासाठी आणि तमाम देशातल्या नागरिकांसाठी भारत पाकिस्तान मॅच म्हणजे काय आणि किती देशभक्तीचा उत्सवच तो! मुंगनेर गावचे रहिवासी सुद्धा आता त्या मॅचची मजा घेऊ शकतील या आनंदात मी होतो. पण इथल्या तरुण मुलांना तर असा कुठला सामना आहे याची पुसट कल्पना देखील नव्हती. तेव्हा वर्ल्ड कप पेक्षा प्रगत भारतीय युवक विरुद्ध मुंगनेरचा युवक ह्यांतल्या सामन्यानेच जरा टेन्शन आलं. आपल्याच जगात आनंदी राहायची त्यांची वृत्ती माझ्या जाणिवेच्या कक्षा अजूनच रुंदावत गेली.

Cost-Benefit Analysis मी आता थोडं फार समजू लागलोय पण गट्ट्यामधल्या माझ्या करिअरच्या महत्वाच्या वर्षांचं CBA केलं तर पर्सनल आणि प्रोफेशनल करिअर दोघांमध्ये मला फक्त आणि फक्त फायदेच मिळाले आहेत. असे काही मूर्त आणि अमूर्त फायदे तुम्ही सुद्धा अनुभवून बघा. चला तर मग,"करके देखों!!"



**अमोल पाटील, निर्माण २**

amol.pat16sept@gmail.com